आज ही देना / Out Today

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com

क्र.म.वि. 6346. दिनांक:–23/5/२०१७.

C/7-33

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
संस्थेंतर्गत सर्व संलग्नीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ,नागपूर.

विषयः–महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९७(१) अन्वये महाविद्यालय विकास समिती गठित करण्याबाबत.

संदर्भः–मा.सहसंचालक, नागपूर यांचे पत्र क्र.उशिनाग/स्टेनो/महा.वि.समिती/२७५६/१७ दि. २६–०४–२०१७.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८५(१) अन्वये प्रत्येक महाविद्यालयात/परिसंस्थेमध्ये एक स्वतंत्र स्थानिक व्यवस्थापन समिती गठित करण्याबाबत आणि समितीच्या रचनेबाबत नमुद होते त्यानुसार प्रत्येक संलग्नीत महाविद्यालयात स्थानिक व्यवस्थापन समिती कार्यान्वीत होत्या हे आपणांस विधितच आहे.

नुकताच **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६** लागु झाला असून यामधील कलम ९७(१) मध्ये नमुद केल्यानुसार **महाविद्यालय विकास समितीची** स्थापना करण्याबाबत मा. सहसंचालकांनी वरिल पत्रान्वये कळविले असून आपणांस कळविण्यात येते की, सदर पत्रान्वये आपल्या संस्थेअंतर्गत असलेल्या महाविद्यालयत **महाविद्यालय विकास समितीची** स्थापना करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सहसंचालक यांचे कार्यालयास व विद्यापीठास पाठवावा. आपल्या सुलभ संर्भाकरिता वरिल पत्राची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

कळावे.

आपला,

(प्रदिप बिनीवाले)
उपकुलसचिव (अति.कार्य.)

सहपत्रे :वरिलप्रमाणे